## निवडक

### अखेर आगरवाडा चोपडे, पार्से, मोरजी गावाचे बदललेले पिनकोड पूर्ववत

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** पोष्ट खात्याने बदलेला आगरवाडा चोपडे, पार्से आणि मोरजी गावाचा पिनकोड नंबर पूर्ववत केला आहे. तसे परिपत्रक मुख्य टपाल कार्यालय पणजी तर्फे काढण्यात आले आहे. त्यामुळे तिन्ही गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त करून केंद्रीय मंत्री तथा उत्तर गोव्याचे खासदार श्रीपाद नाईक यांचे आभार व्यक्त केले आहेत. यासंदर्भात खासदार तथा केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांची भेट घेऊन आगरवाडा चोपडे, पार्से आणि मोरजी तील नागरिकांच्या शिष्ट मंडळाने बदलेला पिनकोड नंबर पूर्ववत करण्याची मागणी केली होती त्यानुसार श्रीपाद नाईक यांनी हे प्रकरण पोष्टाचे वरिष्ठ अधिकारी तसेच केंद्रीय मंत्र्यापर्यंत हे प्रकरण पोचवले होते.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आगरवाडा चोपडे, पार्से आणि मोरजी गाव यापूर्वी पेडणे पोष्ट खात्याच्या अखत्यारीत येत होते त्यामुळे इथला पिनकोड गेली कित्येक वर्षे ४०३५१२ असा होता.तशी येथील प्रत्येक नागरिकांच्या सरकारी कागद पत्र, सरकारी दस्तावेज, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदार ओळख पत्र यात नोंद होती. मात्र गेल्या महिन्यात हा पिनकोड बदल करून आगरवाडा चोपडे व पार्से गावाचा शिवोली पोष्टमध्ये समावेश करून ४०३५१७ हा पिनकोड लागू करण्यात आला होता. तशी प्रक्रिया ही सुरू झाली होती. तर मोरजी गाव हरमल पोस्टाच्या अखत्यारीत आणून त्यांना ४०३५२७ असा पिनकोड जारी केला होता त्यामुळे १६००० पेक्षा जास्त नागरिकांची बरीच गैरसोय होणार होती त्यांना प्रत्येक सरकारी कागद पत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदार ओळख पत्र आदी तसेच अन्य कागदपत्रात पिनकोड नंबर बदलावा लागणार होता त्यामुळे बरीच गैरसोय होणार होती त्यामुळे येथील नागरिकांनी याविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली होती.पणजी येथील पोस्ट मास्टर जनरल, सुपरिटेंड, स्थानिक आमदार,खासदार यांना निवेदने सादर केली होती तसेच लोक आंदोलनाचा इशाराही दिला होता. याची दखल घेऊन पणजी मुख्य टपाल कार्यालयाचे संचालक आर. आर. पाटील यांनी हा बदल पूर्ववत करण्याचे आश्वासन दिलं होत या आश्वासनांची पूर्तता केल्याने आगरवाडा चोपडे, पार्से आणि मोरजी गावाचे सरपंच, पंच सदस्य आणि नागरिकांनी या सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

---

### साळ खालचावाडा येथील पथमार्गाचे पेव्हर्स सुस्थितीत बसविण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १ :** साळ पंचायत क्षेत्रातील खालचावाडा मुख्य रस्ता ते उमादेवी राऊत यांच्या घरापर्यंत च्या पथमार्गावर नव्यानेच बसविलेले पेवर्स सुस्थितीत बसविण्याची काम सदर ठेकेदाराने केले नाही. काही महिन्यातच पेवर्स ची पकड ढिली झाली. पेवर्स बसविण्यासाठी खडीची योग्य भुकटी न वापरल्याने चालताना सुद्धा सदर पेवर्स हलतात. दुचाकी येत असेल तर पेव्हर्सचा १०० मीटर पर्यंत आवाज ऐकू येतो. रात्रीच्या वेळेस दुचाकी घसरुन पडल्यागत आवाज होतो, त्यामुळे शेजारी घरातील व्यक्ती दचकून जागी होतात. पेवर्स बसविताना निष्काळजीपणा दिसत होता, तेथील नागरिकांनी योग्य प्रकारे बसवावेत असेही सांगितले, पण नागरिकांचे ऐकून न घेता बसविले त्यामुळे आजची परिस्थिती उद्भवली. याबाबत ग्रामसभेत प्रश्न विचारला असता लवकरच ते बसविण्यात येणार आहेत. असे म्हणता महिने लोटले पण उपाय केले नाही. पंचायत कार्यालयातून कळले की पथमार्गाचे पेवर्स जोपर्यंत ठिकठाक बसविले जाणार नाहीत तोपर्यंत त्यांचे बिलाची रक्कम दिली जाणार. पंचायत येथे एखादी दुर्घटना होण्याची वाट तर बघत नाही ना असा प्रश्न पडतो. तरी साळ गडेत्सवाअगोदर पथमार्गाची डागडुजी करावी अशी येथील नागरिकांची मागणी आहे. गडेत्सवात लोकांची वर्दळ वाढते. तसेच तिसऱ्या अंधाऱ्या रात्री गडे सुद्धा या वाटेचा अवलंब करतात हे ध्यानात ठेवून ठेकेदाराने लवकरच हा पथमार्ग आवाज रहित करावा.

# सिकेरी टेकडी वाचवण्यासाठी लढा सुरूच ठेवणार

■ टीम दैनिक हेराल्ड



**कळंगुट, दि. १ :** सिक्केरी येथील इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेडने शेतीसाठी असलेली १,३८,९०० चौरस मीटर जमीन बिगर-कृषी उद्देशाने रूपांतरित करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. या प्रस्तावाविरोधात कळंगुट मतदारसंघ मंचने आक्षेप नोंदवले असून, यावर म्हापसा येथील अतिरिक्त जिल्हाधिकारी पुंडलिक खोरजुवेकर यांच्या समोर होणारी सुनावणी २५ मार्चपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.

कळंगुट मतदारसंघ मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांना सुनावणीची सूचना केवळ एक दिवस आधी, गुरुवारी संध्याकाळी ५ वाजता मिळाली. त्यामुळे उत्तर दाखल करण्यासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने सुनावणी स्थगित करण्याची विनंती करण्यात आली होती.

कळंगुट मतदारसंघ मंचचे अध्यक्ष प्रेमानंद दिवकर यांनी सांगितले की, राज्य सरकारने आयएचसीएल सोबत सिकेरि येथे कौशल्य विकास केंद्र उभारण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे सरकार २५ मार्चपूर्वीच जमीन रूपांतरणाची प्रक्रिया गतीने पूर्ण करू शकते. यासंदर्भात त्यांनी शंका व्यक्त केली की, हा प्रकल्प बिगर-कृषी क्षेत्रात रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला जात आहे.सुरुवातीला येथे ८८ खोल्या आणि इतर सुविधा असलेले क्लब-हाऊस बांधण्याची योजना होती. मात्र, आमच्या आक्षेपांमुळे हे प्रकल्पाचे स्वरूप बदलून कौशल्य विकास केंद्र बनविण्यात आले आहे,असे दिवकर यांनी स्पष्ट केले.

कळंगुट मतदारसंघ मंचने अलिकडेच कांदोळी येथे दोन जनजागृती बैठका घेतल्या होत्या, ज्यामध्ये स्थानिक नागरिकांनी सिकेरि टेकडीवरील कोणत्याही विकासकामाला विरोध दर्शवला. या बैठकीत एक ठरावही संमत करण्यात आला की, टेकडीवरील कोणताही प्रकल्प स्थानिकांचा आणि पर्यावरणाचा मोठा धोका ठरू शकतो.जर सरकारने हा प्रकल्प पुढे रेटण्याचा निर्णय घेतला, तर आम्ही न्यायालयात जाऊ. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास संपूर्ण टेकडी नष्ट होण्याची शक्यता आहे. परिणामी, आसपासच्या भागातील जमिनींचा व्यावसायिक विकास होऊन हे क्षेत्र काँक्रीटच्या जंगलात परिवर्तित होईल. गोव्याच्या टेकड्या नष्ट झाल्यास राज्याचा पर्यटन उद्योगही धोक्यात येईल, असे दिवकर यांनी म्हटले.

काही महिन्यांपूर्वी, कळंगुट मतदारसंघ मंचने दाखल केलेल्या याचिकेच्या आधारावर गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिला होता. त्यानंतर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सिकेरि येथील फोर्ट आग्वाद जवळील कथित बेकायदेशीर बांधकाम थांबवले होते.सिकेरि टेकडी वाचवण्यासाठी स्थानिक नागरिक आणि पर्यावरण प्रेमी संघटना लढा देत आहेत. आता पुढील सुनावणी २५ मार्च रोजी होणार आहे.

## नर्सिंग कॉलेजबाबत सर्व भागधारकांना विश्वासात घेणार : आरोग्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १ :** दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात नर्सिंग कॉलेज सुरू करण्याच्या निर्णयापूर्वी सर्व संबंधित भागधारकांचा विश्वास जिंकला जाईल, असे आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री आणि आरोग्यमंत्री यांच्यात या विषयावर वेगवेगळी विधाने होत असल्याच्या आरोपांना उत्तर देताना, राणे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

राणे यांनी सांगितले की, राज्याच्या महत्त्वाच्या निर्णयांबाबत मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि त्यांच्यात संपूर्ण एकमत आहे. सुरुवातीला राज्यात खाजगी वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यावर विचार केला गेला होता, परंतु नर्सिंग कॉलेज उभारणीची प्रक्रिया तुलनेने जलद होऊ शकते, असे त्यांनी निदर्शनास आणले. माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर पर्रिकर यांनी यासंदर्भात आधीच आवश्यक तरतुदी केल्या आहेत, तर वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी आवश्यक औपचारिकता अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत.

राणे यांनी प्रशासनातील चर्चेसाठी वाव असला तरी अंतिम निर्णय सर्वसंमतीने घेतला जाईल, असे स्पष्ट केले. तसेच, राज्यातील वैद्यकीय शिक्षणासाठी जागा वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

अन्न व औषध प्रशासन आपल्या नियमित छाप्यांची मोहिम सुरूच ठेवेल, असेही राणे यांनी स्पष्ट केले. मग ते कृत्रिमरित्या पिकवलेली फळे असोत, कालबाह्य औषधांची विक्री करणाऱ्या फार्मसी असोत, स्वच्छतेचे उल्लंघन करणारी हॉटेल्स व रेस्टॉरंट्स असोत किंवा अन्य नियमभंग असोत, एफडीए कठोर कारवाई करत राहील, असे त्यांनी सांगितले.

## १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना इंधन नाही

**नवी दिल्ली, दि. १ :**

३१ मार्चपासून १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना दिल्लीतल्या पेट्रोल पंपांवर इंधन मिळणार नाही असा निर्णय दिल्ली सरकारने घेतला आहे. दिल्लीतील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर कठोर उपाययोजना राबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पर्यावरण नियंत्रणासंदर्भातील एका उच्चस्तरीय बैठकीत जुन्या वाहनांवरील निर्बंध, अनिवार्य धुरकटीकरण उपाययोजना आणि इलेक्ट्रिक सार्वजनिक वाहतुकीकडे संक्रमण यासंदर्भात चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

पर्यावरण प्रदूषणाला आळा घालण्यासाठी सरकार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. पेट्रोल पंपांवर विशेष गॅझेट बसवण्यात येणार असून, ते १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांची ओळख पटवेल आणि अशा वाहनांना इंधन देण्यास मज्जाव करेल, असे मंत्री सिरसा यांनी स्पष्ट केले. तसेच, या निर्णयाची माहिती केंद्र सरकारच्या पेट्रोलियम मंत्रालयालाही देण्यात येणार आहे. दिल्लीतील मोठ्या इमारती, व्यावसायिक संकुले, हॉटेल्स आणि बांधकाम स्थळांवरील धुळीचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी अँटी-स्मॉग गन' बसवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. दिल्लीतील सर्व उंच इमारती, मोठी हॉटेल्स, कार्यालयीन संकुले आणि विमानतळावर अँटी-स्मॉग गन बसवणे अनिवार्य करण्यात येणार आहे.बांधकाम स्थळांवर देखील हे तंत्रज्ञान वापरणे बंधनकारक असेल, असे सिरसा यांनी स्पष्ट केले.

सरकारच्या प्रदूषणविरोधी मोहिमेचा एक भाग म्हणून २०२५ पर्यंत दिल्लीतील ९०% सार्वजनिक सीएनजी बसेस हटवण्याचा आणि त्या जागी इलेक्ट्रिक बसेस आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्ली पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष निश्चल सिंघानिया यांनी सरकारच्या या निर्णयाचे समर्थन करत सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने आधीच १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांवर बंदी घातली आहे. आम्ही सध्या पीयूसी (प्रदूषण तपासणी) नसलेल्या वाहनांना इंधन देताना अलर्ट देण्याची प्रणाली वापरत आहोत. त्याच तंत्रज्ञानाचा उपयोग जुन्या वाहनांना इंधन नाकारण्यासाठी केला जाऊ शकतो. जर प्रदूषणाची पातळी अत्यंत गंभीर झाली, तर केंद्र सरकारकडून क्लाउड सीडिंग'द्वारे कृत्रिम पाऊस पाडण्याची परवानगी घेतली जाईल, असे सिरसा यांनी सांगितले.



**फोंडा : पणजी चौपदरी हायवेवर नागेशी बांदोडा जंक्शनवर अंडरपास बांधण्याचे काम अंतिम टप्यात आले आहे. यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन स्थानिकांना दिलासा मिळणार आहे.**

## काणकोण टपाल कार्यालयात अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड



**आगोंद, दि. १ :** काणकोण, चावडी येथील टपाल कार्यालयाचे मुख्य कार्यालय असून या ठिकाणी अपु-या कर्मचारी वर्गामुळे नागरिकांची गैरसोय होत असून या ठिकाणी कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांकडून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.

चावडी, येथील मुख्य कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या फारच कमी आहे. त्यामुळे या कार्यालयाची प्रमुख जबाबदारी सांभाळणाऱ्या ज्योती नाईक या एकमेव महिला कर्मचाऱ्यावर सगळा भार पडत असल्याचे दिसून येत आहे. आपली दैनंदिन कामे करत असतानाच ग्राहकांच्या समस्यांनाही त्यांनाच सामोरे जावे लागते आहे.

या प्रश्नांवर वारंवार सूचना व तक्रारी करूनही वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करीत आहे, का या अधिकाऱ्यांची संवेदनाच संपलेली आहे? असा प्रश्न करून नागरिक प्रचंड नाराजी व्यक्त करत आहेत. काणकोण तालुक सा सध्या पर्यटन क्षेत्रात चमकत आहे. पर्यटन क्षेत्रातील राज्यातील एक अग्रेसर तालुका म्हणून सुप्रसिद्ध आहे. विविध प्रकारची रजिस्टर्स, रजिस्टर पार्सल, कुरिअर सेवा जी टपाल कार्यालयात माफक दरात उपलब्ध आहे. रेल्वे तिकिटाचे आरक्षण, टपाल बटवा, आवार कार्ड सुविधा, विविध प्रकारच्या सरकारी योजना संबंधी, तसेच कायम ठेवी, तसेच अन्य कामांकरिता स्थानिक तसेच देश-विदेशी नागरिकांचे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात व्यवहार चालू असतात. त्यामुळे कार्यालयीन वेळेत नेहमी नागरिक गर्दी करीत असतात.

गेल्या ६ महिन्यांपासून कर्मचारी कपातीचा फटका या कार्यालयाला बसला आहे. सध्या केवळ एका कर्मचाऱ्यांवर संपूर्ण कार्यालयाचा बोजा पडलेला दिसून येत आहे. त्यामुळे सकाळपासून दुपार पर्यंत या कार्यालयात ग्राहक नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागणे नेहमीचेच झाले आहे.

यामुळे नागरिकांचा वेळ व शक्ती वाया जात आहे. लवकरात लवकर यामध्ये सुधारणा झाली नाही तर नागरिकांनी आंदोलनाची तयारी ठेवली आहे. कारण या भागात आंदोलनाचीच भाषा संबंधिताना समझते.

### मांद्रेत महाशिवरात्रीनिमित्त जपानुष्ठान

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** जपानुष्ठान हे केवळ धार्मिक कर्म नसून, मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रभावी साधन आहे. गुरु मुखोद मिळालेला मंत्रांचा श्रद्धेने व नियमीत जप केल्यास जीवनात आणि वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन समाधान मिळते, असे संत समाज मांद्रे प्रमुख महेश गोडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संत समाजतर्फे दत्त पद्मनाभ पीठ संचालित, पद्मश्री विभूषित सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामी महाराजांच्या आशीर्वादाने जपानुष्ठान सोहळा मांद्रे गावची ग्रामदेवता श्री भगवती सप्तेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त उत्साहात व शिवभक्तांच्या मोठ्या संख्येत संपन्न झाला. जपानुष्ठान कार्यक्रमात यजमान दिनेश मयेकर, विठ्ठल सावंत, कृष्णा गोडकर, गौरेश कोरगावकर, दिगंबर सातोस्कर यांनी आपली सेवा श्री देव सप्तेश्वर चरणी रुजू केली.




## एनडीझेड आणि सीआरझेडच्या संरक्षणाची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. १ :** कुंडईममधील स्थानिक नागरिकांनी अधिकाऱ्यांकडे नो डेव्हलपमेंट झोन (एनडीझेड) आणि किनारी नियमन क्षेत्र (सीआरझेड)चे संरक्षण करण्याची मागणी केली आहे. स्थानिकांना चिंता आहे की अनधिकृत आणि बेकायदेशीर बांधकामांमुळे जैवविविधतेला धोका निर्माण होत असून, पारंपारिक मासेमारी व्यवसायावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. टेकड्या तोडून आणि खारफुटी नष्ट करून वाढणाऱ्या बांधकामांमुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिकांनी स्पष्ट केले की पंचायतीने आठ महिन्यांपूर्वी सीआरझेडमधील बेकायदेशीर बांधकामांची तपासणी केली होती, आणि त्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

स्थानिक रहिवासी आणि शेतकऱ्यांनी नो डेव्हलपमेंट झोनमध्ये सुरू असलेल्या काही अनधिकृत बांधकामांबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सीआरझेड झोनच्या सीमेलगत टेकड्या तोडल्या जात असून, सात मीटर उंचीच्या भूभागावर मोठ्या प्रमाणात काम सुरू आहे. स्थानिक विजेश नाईक यांनी सांगितले की सीआरझेड आणि एनडीझेड क्षेत्रात किमान चार अनधिकृत बांधकामे सुरू असून, यासाठी खारफुटीही तोडली जात आहे.

पर्यावरणीय परिणामांचा उल्लेख करताना कमलेश भंडारी यांनी सांगितले की, यापुढेही जर बांधकामांना प्रोत्साहन दिले गेले, तर स्थानिक शेतकरी आणि पारंपारिक मासेमारी व्यवसायाला मोठा फटका बसू शकतो. ते पुढे म्हणाले की, सीआरझेड क्षेत्र पूरनियंत्रणासाठी महत्त्वाचे असून, मुसळधार पावसाच्या वेळी ते नैसर्गिक जलसंचयन क्षेत्र म्हणून काम करते.

दरम्यान, मानसवाडा खाजन शेतामध्ये स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता बेकायदेशीर मासेमारी सुरू करण्याचा प्रयत्न होत असल्याचे समोर आले आहे. यामुळे भविष्यात खाजन शेतीच्या क्रियाकलापांवर परिणाम होईल, अशी स्थानिक शेतकऱ्यांची भीती आहे. स्थानिकांनी प्रशासनाला एनडीझेडआणि सीआरझेड क्षेत्राचे संरक्षण करण्याची मागणी करत तातडीने कठोर उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.